# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 20/02/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

### दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 4 कि. मी अंतरावर मौजा खदान क्र. 3, मळीबाबा काली मंदीर समोर येथे दिनांक 17/02/2021 चे 17:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सोनु वल्द गुलाब चौधरी, वय 28 वर्षे, रा. 29/8,18 गोंडेगाव कॉलनी कन्हान हा आपल्या आईला दवाखाण्यात सुटटी मिळत असल्याने पैसे घेवून जात असतांना रस्त्यावर फिर्यादीच्या भावास वेकोली कर्मचारी हे मारपीट करतांना दिसून आले. फिर्यादी हा भावाला वाचविण्यास गेला असता अरोपी 1) जितु चौव्हान, वय 28 वर्ष, 2) बबलु वय 25 वर्ष व 3) किसन वय 30 वर्ष तिन्ही रा. वेकोली खदान क्र. 03 कन्हान यांनी फिर्यादीस मारहाण केली. तसेच फिर्यादी हा काही वेळाने दवाखाण्याकडे जात असतांना मौजा खदान क्र. 3 येथील पानठेल्यावर बबलगम घेत असतांना यातील आरोपी आले व त्यांनी फिर्यादीस म्हटले की, ''तेरा भाई वेकोली से कोयला निकालता है, और तु उसको बचाने आता है'' असे म्हणुन संगमत करून आरोपीतांनी फिर्यादीला हातबुक्कीने व डोक्यावर लाकडी दांडयाने मारहाण करून जखमी केले व दुबारा अपने भाई को बचाने आया तो जान से मार देंगे अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना राहुल रंगारी हे करीत आहे.

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 3 कि. मी अंतरावर माथनी येथे दिनांक 19/02/2021 चे 11:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बॅरीस्टर शिरसागर सिंग वय 55 वर्ष, रा. माथनी ता. मौदा हा गावातील शहारे यांचे पानठेल्यावर खर्रा घेण्याकरीता गेला व ''त्याला खर्रा दे'' असे म्हटले असता फिर्यादीचे मागुन आरोपी नामे– प्रकाश भैय्यजी शिवनकर, वय 32 वर्ष, रा. माथनी हा तेथे आला व म्हणाला की, ''पहीले मला खर्रा दे'' असे म्हटले असता फिर्यादीने म्हटले की ''आधी मी आलो आधी मला दे.'' याकारणावरून आरोपीने पानठेल्याच्या बाजुला पडलेली वीट उचलली व फिर्यादीचे डोक्यावर मारल्याने डोक्याला वीट लागुन रक्त निघाले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दीली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे मोक्र 9764007720 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर